**शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणीसाठी/निविदा प्रक्रियेत अनुभवाचे प्रमाणपत्र व यंत्रसामुग्री वार्षिक उलाढाल, (Bid capacity) तत्सम कामे, बाबीचे पात्रता परिमाण, सनदी लेखापालाकडून प्रमाणित लेखापरीक्षण याबाबत सुधारीत नियम.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.९५/ इमारती-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१/०९/२०२३

**संदर्भ :-** १) शासन निर्णय,सा.बां.विभाग क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.१२१/इमा-२ दि.५ जानेवारी २०१९.
२) शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.१२१/इमा.२ दि.१३ जुलै २०२१.
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.९५/इमा-२, दि.१६ नोव्हेंबर २०२१.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णय दि.१६ नोव्हेंबर २०२१ अन्वये शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणीसाठी/निविदा प्रक्रियेत अनुभवाचे प्रमाणपत्र व यंत्रसामुग्री वार्षिक उलाढाल,(Bid capacity) तत्सम कामे, बाबीचे पात्रता परिमाण, सनदी लेखापालाकडून प्रमाणित लेखापरीक्षण याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. परंतु यासंदर्भात शासन स्तरावर निवेदने प्राप्त झाल्याने सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१. कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.९० लक्ष रकमेपर्यंत व विदयुत अभियंत्यांना रु.१० लक्ष रकमेपर्यंत नोंदणी देण्यात यावी.
२. कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.१५० लक्ष रक्कमेसाठी व विदयुत अभियंत्यांना रु.२५ लक्ष रकमेपर्यंत नोंदणी देण्यात यावी.
३. सेवानिवृत्त अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी करतांना त्यांना शासनाकडून / सक्षम प्राधिका-याकडून ना-देय/ ना-चौकशी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४. सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना प्रथमवेळी कंत्राटदार नोंदणी करतांना सरासरी वार्षिक उलाढाल, सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण ताळेबंद, पतधारी प्रमाणपत्र (Solvency Certificate) यंत्रसामुग्री, पूर्ण झालेली कामे (Work Done), व हातातील कामे (Work in Hand) याबाबत सूट देण्यात येत आहे. सदर सूट ही सेवानिवृत्त दिनांकापासून/ राजीनाम्यापासून ५ वर्षापर्यंत लागू राहील.

५. नविन नोंदणीकृत तसेच यापुर्वी नोंदणी झालेले सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना निविदा प्रक्रियेसाठी हातातील कामे (Work in Hand), पूर्ण झालेली कामे (Work Done), बीड कॅपॅसीटी (Bid Capacity), तत्सम कामे (similar works), बाबीचे पात्रता परिमाण (qualification Quantity) सनदी लेखापालांकडून प्रमाणित लेखा परिक्षण, ताळेबंद, वार्षिक उलाढाल, यंत्रसामुग्री इ. बाबी संबंधी निविदा पात्रता निकषांमध्ये (Qualifying Criteria) नोंदणी झाल्यापासून २ वर्ष कालावधीसाठी सुट देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) व पतधारी प्रमाणपत्र (Solvency Certificate) इत्यादी बाबींचे नियम इतर कंत्राटदारांप्रमाणे लागू राहतील.

६. नोंदणीकृत सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना निविदा प्रक्रियेसाठी भरावयास लागणारी एकुण अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Additional Performance Security Deposit) व इसारा रक्कम भरण्यापासून ५०% सुट देण्यात आलेली सूट रद्द करण्यात येत आहे.

७. शासकीय कर्मचा-याने सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षभरात ज्या विभागात काम केले आहे त्या विभागात सेवानिवृत्तीनंतर एक वर्षाच्या कालावधीसाठी निविदा भरता येणार नाही.

८. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा लाभ शासनास अखंडीत व्हावा या हेतूने नोंदणी नुतणीकरणाची अट रद्द करण्यात येत असून नोंदणी कालावधी संपुष्ठात आल्यानंतर नियमित कंत्राटदाराप्रमाणे नोंदणी नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

९. सेवानिवृत्त नोंदणीकृत स्थापत्य अभियंता कंत्राटदार यांना फर्निचर व तत्सम कामासाठी लागणारी आय नोंदणी प्रमाणपत्राबाबत सूट रद्द करण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्ती व साथीच्या रोगासंबंधी अनुषंगिक कामे करण्यास सेवानिवृत्त्त अभियंता कंत्राटदार पात्र राहतील.

१०. सेवानिवृत्त अभियंता यांना सदरील सूट ही सेवानिवृत्तीनंतर/राजीनाम्यानंतर ५ वर्षाच्या आत अर्ज केल्यास मिळू शकेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०९२११५५६३६३४१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, 2.5.4.20=e51dff58ad80dfdae3976edee46d1bf7934d01469cb4d916976c25305666b613, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=40AE84322C80D3E4EA1B574EB3782ED6CB133B938933BDF197ED5A1551D8622A, cn=SACHIN MANIKRAO CHIVATE
Date: 2023.09.21 16:00:10 +05'30'

**( सचिन चिवटे )**

**अवर सचिव (इमारती), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (सा. बां.) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. सचिव (रस्ते), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. सचिव (बांधकामे), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

४. सचिव (रा.म), कोकणभवन, नवी मुंबई.
५. मुख्य अभियंता व सहसचिव यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६. अधीक्षक अभियंता,(पुल / इमारती) संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई.
७. सर्व मुख्य अभियंता, सर्व अधीक्षक अभियंता,
८. सर्व कार्यकारी अभियंता, (जिल्हा परिषदासह)
१०. निवडनस्ती